महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण/ २०२१/४७६ दिनांक : 15 DEC 2021

प्रति,

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC) येथे प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेत सहभाग घेणेबाबत...**

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५, दिनांक ११.१२.२०२०

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२२ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबईसह भारतीय प्रशासकीय पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूर, अमरावती, औरंगाबाद,नाशिक आणि कोल्हापूर केंद्रातील प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने दिनांक ९.१२.२०२१ पासून दिनांक ७.१.२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. सदर प्रक्रियेची सविस्तर माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. ती माहिती विद्यार्थ्यांना देण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्यात यावी.

तसेच यासंदर्भाने पुढे असेही कळविण्यात येते की, संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५, दिनांक ११.१२.२०२० अन्वये सर्व शासकीय, शासन अनुदानीत, विनाअनुदानीत तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक केंद्र आणि समन्वयक नियुक्त करण्याबाबत सर्व संस्थांना कळविण्यात आलेले होते. त्यानुसार आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये समन्वयक नियुक्त केले असल्याची माहिती आपण सादर केलेली आहे. उपरोक्त प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेशासाठी आयोजित सामायिक प्रवेश परीक्षेकरिता प्रशिक्षण केंद्रांची माहिती, समन्वयकांसाठी सूचना, सेमिनारचे मुद्दे हे संस्थांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या समन्वयकांना कळविण्याबाबत व त्यांचेकडून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबतही कळविण्यात यावे.

उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

( संदिप तडस )
उपसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2021/ 3547
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांक:- 16 DEC 2021

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीकरीता. यांना कळविण्यांत येते की, उपरोक्त पत्रात दिलेल्या सुचनेप्रमाणे आपल्या स्तरावर कार्यवाही करावी व केलेले कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यांत यावा.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,

ई-मेल - desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण/ २०२१/४७८ दिनांक : 15 DEC 2021

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर

विषय : **राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC) येथे प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेत सहभाग घेणेबाबत...**

संदर्भ : संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५, दिनांक ११.१२.२०२०

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वतोपरी प्रयत्न करीत आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२२ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था मुंबईसह भारतीय प्रशासकीय पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूर, अमरावती, औरंगाबाद,नाशिक आणि कोल्हापूर केंद्रातील प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याकरिता इच्छुक उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने दिनांक ९.१२.२०२१ पासून दिनांक ७.१.२०२२ पर्यंत अर्ज मागविण्यात आले आहेत. सदर प्रक्रियेची सविस्तर माहिती सोबत जोडून पाठविण्यात येत आहे. ती माहिती विद्यार्थ्यांना देण्याबाबत आपल्या अधिनस्त सर्व पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना देण्यात यावी.

तसेच यासंदर्भाने पुढे असेही कळविण्यात येते की, संचालनालयाचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/२०२०/३५५, दिनांक ११.१२.२०२० अन्वये सर्व शासकीय, शासन अनुदानीत, विनाअनुदानीत तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक केंद्र आणि समन्वयक नियुक्त करण्याबाबत सर्व संस्थांना कळविण्यात आलेले होते. त्यानुसार आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये समन्वयक नियुक्त केले असल्याची माहिती आपण सादर केलेली आहे. उपरोक्त प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रवेशासाठी आयोजित सामायिक प्रवेश परीक्षेकरिता प्रशिक्षण केंद्रांची माहिती, समन्वयकांसाठी सूचना, सेमिनारचे मुद्दे हे संस्थांमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या समन्वयकांना कळविण्याबाबत व त्यांचेकडून त्यानुसार कार्यवाही करण्याबाबतही कळविण्यात यावे.

उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

( संदिप तडस )

उपसंचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सविनय सादर -

१. मा.स्वीय सहाय्यक ,मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२

२. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ४०००३२

E:\Budage\2021-22\General Correspondence\CET for SIAC (Competetive exams).docx



मा.श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री. अजित पवार
उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री. बाळासाहेब थोरात
महसूल मंत्री, महाराष्ट्र राज्य



मा.श्री. उदय सामंत
उच्च व तंत्र शिक्षणमंत्री
महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र शासन

## राज्य प्रशासकीय व्यवसाय प्रशिक्षण संस्था (SIAC)

**हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्स समोर, मुंबई - ४०० ००१**

सामायिक प्रवेश परीक्षा - २०२२

UPSC - नागरी सेवा परीक्षा (IAS / IFS / IPS) २०२२ च्या तयारीसाठी परीक्षा पूर्व प्रशिक्षण कार्यक्रम - २०२२

**महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचा UPSC - नागरी सेवा परीक्षेत यशस्वी होण्याचा टक्का वाढवा याकरिता पूर्व प्रशिक्षण प्रवेश परीक्षेत जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा.**

केंद्रीय सेवा आयोगाच्या नागरी सेवा परीक्षा २०२२ च्या पूर्व प्रशिक्षणाकरिता पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबईसह भारतीय प्रशासकीय पूर्व प्रशिक्षण केंद्र नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नाशिक आणि कोल्हापूर केंद्रातील प्रशिक्षण प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले आहे. याकरिता इच्छुक पात्र उमेदवारांकडून online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

शैक्षणिक पात्रता :-

उमेदवार हा कोणत्याही मान्यता पात्र विद्यापीठाचा पदवीधर असावा किंवा जो उमेदवार पदवी अभ्यासक्रमाच्या शेवटच्या सत्र (semester) परीक्षेला बसलेला आहे आणि ज्यांचे निकाल प्रलंबित आहेत (अशा उमेदवारांनी प्रवेशाच्या वेळीस ट्रान्सफर सर्टिफिकेट देणे बंधनकारक राहील). प्रवेशीत विद्यार्थ्यांना अद्ययावत अभ्यासिका, पूर्णवेळ विनामूल्य प्रशिक्षण वसतिगृहाची सुविधा व मासिक विद्यावेतन शासन निर्णयानुसार व शासनाने वेळोवेळी केलेल्या सूचनांनुसार देण्यात येईल.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | ऑनलाइन अर्ज भरण्याची सुरुवात | दि. ०१/१२/२०२१ | गुरुवार | सकाळी १०.०० पासून |
| २. | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०७/०१/२०२२ | शुक्रवार | रात्रौ. १२ वा.पर्यंत |
| ३. | फी भरण्याचा अंतिम दिनांक | दि. ०९/०१/२०२२ | रविवार | सायं. ५ वा.पर्यंत |
| ४. | अभिरुप (Mock) चाचणी | दि. १२/०१/२०२२ | बुधवार | सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत |
| ५. | सामायिक ऑनलाइन प्रवेश परीक्षा | दि. १६/०१/२०२२ | रविवार | सकाळी ११ ते दुपारी १ वा.पर्यंत |
| ६. | परीक्षा निकाल | दि. २०/०१/२०२२ | गुरुवार | सायं. ५.०० वाजता |

उमेदवारांना ऑनलाइन परीक्षेचे (२०० गुण) व मुलाखतीचे (५० गुण) मिळवून मिळणाऱ्या गुणांच्या आधारे प्रवेश दिला जाईल व मुलाखतीची तारीख व वेळ ऑनलाइन परीक्षेनंतर कळविण्यात येईल.

**दूरध्वनी क्रमांकः ०२२-२२०७०९४२/२२०६१०७१ Email Id - siac1915@gmail.com**

सविस्तर जाहिरात, परीक्षेचा अभ्यासक्रम आणि पात्रता, online अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in किंवा www.siacexam.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# Pre IAS Training Centre

1. Good News for aspirants preparing for UPSC (C.S) examination in Maharashtra. Government of Maharashtra's Higher and Technical Education Ministry is providing FREE COACHING, FREE HSOTEL FACILITY and MONTHLY STIPEND of Rs. 4000 for library ONE YEAR to 450 Aspirants who are preparing for UPSC (C.S) exam from Maharashtra.
2. These 450 aspirants are to be selected from Common Entrance Test (CET).
3. Each Coordinator from respective College is expected to enrol minimum 100 students for this exam. To further enhance Coordinators work, they can enroll 20 - 50 students each from past 4 years graduate i.e. 2017 to 2020.
4. 50 to 100 students who are currently in last year or 10% of the student's strength studying in last year of the degree whichever is higher.
5. Government of Maharashtra has taken up this initiative to INCREASE AWARENESS of UPSC (C.S) exam among students, to INCREASE SUCCESSFUL PERCENTAGE of STUDENTS from MAHARASHTRA, to ENCOURAGE and give RIGHT APPROACH & GUIDANCE to crack this examination.
6. Aspirants will be trained for Pre, Mains, and Personality test of UPSC (C.S) Exams.
7. Preparing for UPSC (IAS, IFS, IPS, IRS etc.) gives you a broader perspective of competitive examination and right approach to crack every other competitive examinations like MPSC (Rajya Seva, Combined Group B exam assistant section officer, Sales tax inspector and Police Sub Inspector), IFoS, APFC, NDA, CDS, SSC, LIC AAO & ADO, RBI Grade B, SBI PO, IBPS PO etc.
8. DEDICATED EFFORTS, RIGHT APPROACH, PROPER GUIDANCE, TEST SERIES, SINCERITY, DISCIPLINE CONSISTENCY are the KEYS to crack UPSC Examination
9. Government of Maharashtra's "Pre IAS Training Centre" is going to play pivotal role in this.

For Registered Students:

1. Lectures for CEC once in a week for 4 weeks.
2. One successful students lecture.
3. One mock test.
4. Time Table.

# UPSC
# Coordinator Work

1. Every College needs to appoint a Coordinator who must be an Assistant professor, as per letter from Director, DHE, Pune. Dt. 17th November, 2022
2. Coordinator must create awareness about UPSC (C.S) examination and steps taken by Government of Maharashtra for UPSC (C.S) aspirants.
3. Coordinator is expected to enroll minimum 100 students and encourage them to take up this examination to gain actual UPSC exam Experience.
4. To further enhance Coordinators work, they can enroll 20 - 50 students each from past 4 years graduate i.e. 2017 to 2020 and 20 - 50 students who are currently in last year or 10% of the student's strength studying in last year of the degree whichever is higher.
5. Coordinators must explain the benefits of enrollment in the "Pre IAS training centre" of the Government to the students.
6. To report daily numbers of enrollment done to ____ Pre-IAS center on mail____
7. Weekly report signed by the principle should be mailed to JT Director.
8. Enroll CEC students, especially last year degree students (who are eligible for selection in Pre-IAS centre's free coaching)
9. First year & Second year degree students can also appear for the exam to increase their awareness and get an early experience of exam, which will get ride of fear & many myths.
10. Post Graduate students have more advantages to appear & clear this entrance exam.
11. To conduct online/offline awareness lectures once in a week for 4 weeks.
12. APPRECIATION LETTER FOR Good Work & Students paid registrations.

For Students Awareness

# Seminar Points

1. Benefits of **Govt of Maharashtra's** Higher & Technical Education Department's "Pre IAS training Centre" includes free coaching for one year, ₹4000 stipend per month and free hostel facility & library facility to students who clear entrance exam..
2. Preparing for UPSC (IAS, IFS, IPS, IRS etc.) gives you a broader perspective of competitive examination and right approach to crack every other competitive examinations like MPSC (Rajya Seva, Combined Group B exam assistant section officer, Sales tax inspector and Police Sub Inspector), IFoS, APFC, NDA, CDS, SSC, LIC AAO & ADO, RBI Grade B, SBI PO, IBPS PO etc.
3. **Salary** of IAS, IPS, IFS and other group A posts in UPSC is approximately **Rs.65, 000,** which is similar to RBI Grade A, SBI PO and LIC AAO & ADO exams.
4. Which career are you going to pursue after Graduation,

   SERVICE or BUSINESS?
5. If you have decided to do SERVICE then why not PUBLIC SERVICE?
6. PUBLIC SERVICE Gives you;

   I) Job Security

   II) Handsome Salary

   III) Status in the Society

   IV) Decision making Role

   V) Job Satisfaction

   VI) Opportunity to serve our Country.
7. You get an Opportunity to rise at the highest level in respective Department of Government.
8. If you start UPSC preparation after 12th standard, you can crack the Elite exam in your first attempt. At the **age of just 21** you can get your **first salary** approximately **Rs. 65,000** salary pm.

9. There is **no need to go to Delhi** and pay exorbitant fees for Coaching.
10. Most of the students have to give a second thought while opting for **Medical stream**, due to hike in fees every year. Few students get admission into Government Medical College where Seats are Limited and Fees are Less as compared to Private Medical Colleges where total fees are between **35 lakhs to 1 crore** with abundant seats.
11. Even in **Engineering stream** fees have soared and in few sought after Private college's fees are upto Rs. **2 lakh** per annum. Fees in Deemed and Private Universities are even higher.
12. Even a Student with just **pass class (i.e 35%)** in Graduation is eligible & can clear the UPSC Examination if he/she gets a proper guidance at right time with proper approach to clear the examination.
13. Most of the competitive examination requires a Graduate Degree in **ANY STREAM.**
14. There are Students who have scored second class through out there career but have **cleared** UPSC (C.S) and multiple Group A & B **examinations in the same year.**

महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०,
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन/ २०२०/२५५ दिनांक : 11 DEC 2020

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय, शासन अनुदानीत,
विनाअनुदानीत तांत्रिक व्यावसायिक
पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : प्रत्येक तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थेत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र स्थापन करणे आणि समन्वयक नियुक्त करणे

केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या प्रशासकीय सेवापूर्व परीक्षेमध्ये महाराष्ट्रातील मुलांचे प्रमाण वाढावे यासाठी महाराष्ट्र शासन संपूर्ण राज्यात सर्वतोपरी प्रयत्न करीत असून पूर्ण राज्यात अशी ०६ भारतीय प्रशासकीय सेवापूर्व परीक्षा प्रशिक्षण केंद्र शासनाने सुरू केलेली आहेत. यात संबंधित विषयाच्या तज्ञांकडून प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात येते. सदर प्रशिक्षण केंद्रामधून दरवर्षी सुमारे ५४० मुलांना विनामुल्य प्रशिक्षण देण्यात येते, शिवाय त्यांना मासिक खर्चासाठी दरमहा शिष्यवृत्तीही दिली जाते. मागील काही वर्षातील अनुभव पाहता सदर केंद्रामध्ये प्रवेश मिळविण्यासाठी परीक्षा देणा-या मुलांची संख्या वाढली आहे, परंतू किमान गुणही अनेक मुले मिळवू शकत नाही असे दिसून येते. यासंदर्भात मुलांना उचित मार्गदर्शन मिळणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्रात असणा-या भारतीय प्रशासकीय सेवापूर्व केंद्राची माहिती विद्यार्थ्यांना देणे, केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात येणा-या परीक्षांची माहिती विद्यार्थ्यांना देणे, सदर परीक्षांसाठी त्यांना प्रोत्साहित करणे, जास्तीत जासत मुलांसाठी फॉर्म भरला जाईल यासाठी पाठपुरावा करणे, भारतीय सेवा परीक्षेची तयारी करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणे, शासनाद्वारे स्थापन केलेल्या परीक्षा केंद्रांमध्ये प्रवेश परीक्षेसाठी मार्गदर्शन करणे, इ.सर्व कामे करण्यासाठी नव्याने सेवेत आलेल्या व योग्य मार्गदर्शन करु शकणा-या सहाय्यक प्राध्यापकाची समन्वयक म्हणून नेमणूक करावी. जेणेकरुन त्यांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना अनेक वर्ष मिळू शकेल. नेमणूक आदेशाची प्रत सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय तसेच संबंधित विद्यापीठांचे कुलसचिव यांना देण्यात यावी.

सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये यांनी त्यांच्या विभागातील संस्थांकडून उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी होण्याबाबत पाठपुरावा करावा व संस्थेमध्ये समन्वयक नियुक्त करण्यात आले आहेत याबाबतची माहिती संचालनालयास सादर करावी.

सदर सूचना विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी असून केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत घेण्यात येणा-या परीक्षांमध्ये महाराष्ट्रातील अधिकाधिक विद्यार्थी यशस्वी व्हावेत या उद्देशाने देण्यात येत आहेत. सदर समन्वय पदासाठी कोणतेही मानधन अथवा विशेष वेतन लागू होणार नाही.

( डॉ.अभय वाघ )
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : माहितीस्तव सविनय सादर

१. मा.स्वीय सहाय्यक ,मंत्रीमहोदय,उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
२. मा.प्रधान सचिव,महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय,मुंबई ३२

प्रत : माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी

१. मा.कुलसचिव,सर्व अकृषि विद्यापीठे- त्यांना विनंती करण्यात येते की, केंद्रीय लोकसेवा आयोग आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत घेण्यात स्पर्धा परीक्षांसाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करण्यासाठी योग्य त्या सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना देण्यात याव्यात.
२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती, नागपूर- त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक आपल्या विभागाच्या अधिपत्याखालील तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर संस्थांच्या निदर्शनास आणण्यात यावे.